Vol 4 Issue 8 Feb 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# तेंडूलकरांच्या 'घाशीराम कोतवाल'मधील व्यक्तिदर्शन आणि आशय सौंदर्याचा विचार

*संजय संभाजी लांडगे*

सहयोगी प्राध्यापक-मराठी विभाग, अे. आर. बुर्ला महिला कॉलेज, सोलापूर.

***सांराश :*** विजय तेंडूलकर हे मराठीतील एक महत्त्वाचे नाटककार आहेत. मराठी नाट्यक्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या वेगळ्या नाटकांनी मोलाची भर घातली आहे. तेंडूलकरांनी नाटके, एकांकिका, बालनाट्ये, अनुवादिक नाटके अशा विविध प्रकारात लेखन केले आहे. विशेषतः सामाजिक, राजकीय, मनोविश्लेषणात्मक, गंभीर आणि शांत स्वभावाची सुखात्मिक नाटके त्यांनी लिहिली आहेत. कावळ्याची शाळा, शांतता! कोर्ट चालू आहे, अशी पाखरे येती, गिधाडे, सखाराम बाइंडर, घाशीराम कोतवाल, कन्यादान, ही काही त्यांची गाजलेली नाटके आहेत.

## *प्रस्तावना :*

तेंडूलकरांचे नाव प्रायोगिक नाट्यलेखनाशी आणि या प्रकारच्या रंगभूमीशी जोडले गेले आहे. ते व्यावसायिक नाटककार म्हणून पुढे आल्या नंतरही त्यांच्या नावाशी जोडले गेलेले हे प्रायोगिकतेचे नाते पुसले गेले नाही. विजय तेंडूलकर, सतीश आळेकर, सुरेश खरे, महेश एलकुंचवार अशा कितीतरी मान्यवर नाटककारांनी त्या काळातील मराठी रंगभूमीवर आपली प्रायोगिक नाटके लिहून दिली. आणि ती तितक्याच ताकदीने सादर ही झाली. त्यामुळे प्रायोगिक रंगभूमीला त्याकाळी वैभव प्राप्त झाले होते. तेंडूलकरांनी शांतता! कोर्ट चालू आहे. गिधाडे काळे बेट लालबत्ती, सखाराम बाइंडर, घाशीराम कोतवाल अशी एकापेक्षा एक सरस नाटके देऊन मोलाची भर घातली आहे. त्यांच्या या सगळ्या नाटकापैकी मनात ज्याने मोठी खळबळ निर्माण केली ते नाटक म्हणजे 'घाशीराम कोतवाल' होय.[१] काय आहे तरी काय या नाटकामध्ये ते आपण पाहूयात.

## *'घाशीराम कोतवाल'चे आशय सौंदर्य :-*

घाशीराम कोतवाल हे म्हणजे पेशवाईचा इतिहास नव्हे! किंवा इतिहासाची उजळणी करण्यासाठी किंवा इतिहासातून संदेश देण्यासाठी हे नाटक लिहिलेले नाही. तरीही या नाटककासाठी इतिहासाचा आधार जरूर घेतला आहे. हे तेंडूलकरांनी मान्य केले आहे.[२] परंतु असे जरी असले तरी 'पेशवाई... नाना फडणवीस, घाशीराम कोतवाल यांच्या इतिहासातील बऱ्यावाईट अस्तित्वाविषयी मत प्रदर्शन करण्याचा लेखकाचा हेतू नाही.' असे स्वतःच तेंडूलकर म्हणतात. म्हणजेच घाशीराम कोतवाल हे नाटक वास्तवाचे चित्रण करणारे अथवा वास्तवाविषयी मतप्रदर्शन करणारे नाटक नाही. म्हणून मग प्रश्न पडतो की हे नाटक नेमके काय आहे? याविषयी लेखक स्वतःच म्हणतात, '...ही एक...... नृत्यसंगीतमय दंतकथा आहे.'[३] आता दंतकथा म्हटले की ती संपूर्ण सत्य नसते आणि संपूर्ण असत्यही नसते. तरीही परंपरेने चालत आलेले आणि समाज्याने स्विकारलेले ते सत्यच असते असेच म्हणावे लागते. परंतु वरील सर्व गोष्टीचा विचार खरा मानण्यापेक्षा प्रत्यक्षात आपणास संहिता काय सांगते ते पाहणेच संयुक्तीक होईल. खरे सत्य समजण्यासाठी संहिते एवढा पुरावा दुसरा कुठलाच सत्य नाही.[४] या दंतकथेमध्ये नृत्य, संगीत, इतिहास, अनैतिकाहसिक, दंतकथा, त्यामध्ये असणारा साहित्याचा अंर्तभाव या सगळ्याच गोष्टीचा निर्वाळा या संहितेच्या आधारे घेता येईल.

या नाटकाची सुरूवात नमनाने होते. या नमनामध्ये बाराजण नमन म्हणताहेत. ते नमन म्हणताना इकडे तिकडे झुलत आहेत. नमन म्हणणारे पुण्याचे बामन आहेत. असे ते स्वतःच सांगताहेत. गणराया बरोबर सरस्वती आणि लक्ष्मी ही नृत्य करीत गात आहेत. म्हणून हे नमन नेहमीचे नाही वेगळे आगळे आहे. नमन संपताना आशिर्वचनानंतर मंगलमुर्तीच्या जयजयकारात गणपती, सरस्वती, लक्ष्मी जातात. नमनाचे रूपांतर भजनात होते आहे. 'पुंडलिक वरदा हरि विठ्ठल। ज्ञानदेव तुकाराम आणि पुन्हा झुलत, लयीत नमनाचे पालुपद श्री गणराज नर्तन करी। आम्ही पुण्याचे बामन हरी। पुन्हा झुलत लयीत नमनाचा आरंभ! पारंपारिक नमनात असे नाही. शेवटी हरदासाच्या थाटांत सूत्रधार हे थांबवितो' नमन हे नाटकाचे एक अंगच असते.

या नाटकामध्ये येणारा सूत्रधार हा वेगळा आहे. तो नेहमीच्या नाटकात येणाऱ्या सूत्रधार-नटी सारखा नाही. हा सूत्रधार संपूर्ण नाटकात उपस्थित आहे. आणि तो काहीतरी कार्यभार सांभाळीतच असतो. लोकरंगाशी जवळीक साधणारे हे ही नाटकाचेच अंग आहे. बारा पुणेकर बामणांचे नमन व झुलणे थांबवून सूत्रधार प्रत्येकाचा परिचय करून देतो. वेदांतशास्त्री, वैद्यराज, असे एकेक करीत बाराजणांची ओळख होते. त्यातच असे तसे छोटे-छोटे पण भेदक आणि प्रहसनगर्भ-संवाद झडत जातात आणि त्यातून नाट्य निर्माण होते नाटक पुढे सरकते.

सूत्रधार सांगत राहतो बावन्नखणीत रंगदरबार भरला आहे. रंग उधळला जातो. तिकडे ब्राह्मणीस घडे एकांतवास त्यातच शिंदेशाही पगडीतला एक सरदार येतो. दोघांचा शृंगार होतो. अनाचाराची सर्वत्र वास्तवता त्यातून प्रतिबिंबित होते. माणसांचा पडदा लयीत झुलतो आहे. प्रवेश निगमन त्यातूनच ब्राह्मण बामणीचा नाच जोडीला आहे. पडदा, दुभंगून ते सामुदायिकतेचे दर्शन होते. त्यामधून अनाचाराचे चित्र स्पष्ट होते. थोड्याच वेळात नानाचे आगमन सोबत घाशीराम ब्राह्मणीचा नाच चालूच आहे. घाशीराम देखील नाचात उतरतो. नाना पाय उचलून एका पायावर नाचू लागतात. नानांचा एक पाय मुरगळला एका पायावर नाचत राहतात. एकच गदारोळ नानाने उचललेला एक पाय घाशीराम आपल्या पाठीवर घेतो. घाशीरामांच्या हाती नानाचा जोडा राहतो. सगळ्या सामुदायिक घटना येथे व्यक्तित्वदर्शनाला जागा नाही. त्यामुळे कोणत्याही माणसाला व्यक्ती म्हणून चित्रणस्थान नाही. मग तिला नाव कोणतेही दिलेले असो. ती व्यक्ती प्रतिनिधी आहे एक समुहाची. माणसांच्या झुलत्या पडद्यात व्यक्तित्व आहे. पण तो तर समुदायाचा बनलेला आहे. हे त्याचे प्रतिक आहे. तोल हरवलेल्या एका समाजस्थितीचे संतुलित व लयबद्ध दर्शन इथे घडते.

### *सूचकता आणि विडंबन :-*

जाता जाता नाना मेण्यातून 'गळ्यातला हार' घाशीरामाकडे टाकतात तो मात्र घाशीराम 'अल्लद' झेलतो. हाच घाशीराम नानांच्या गळ्यातील ताईत बनतो. किती समय सूचकता! परंतु गुलाबबाई तो हार आपल्या हस्तकाच्या मदतीने घाशीरामाकडून हिसकावून घेते. हा उफराटा न्याय या व्यवस्थेत दिसतो. पण ही व्यवस्था नाकारणारा घाशीराम रस्त्यावर फेकला जातो. अपमानाचे शल्य घेऊन घाशीराम पर्वतीखालच्या 'रमण्या'त बावन्नखणीतील जीवनातील नाण्याची दुसरी बाजू म्हणजे हा 'रमना' ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याचा सरकारी सोहळा इथेही सौदेबाजी करण्याचा प्रयत्न होतो. हे विडंबन चित्र इथे दिसते. विडंबनात नाट्य असते. ब्राह्मणांच्या आपआपसातील संभाषणातून व्यक्त होते. लाचारी वशिलेबाजी भ्रष्टाचार सर्व काही दक्षिणा मिळावी, भोजन मिळावे यासाठी! तर घाशीरामाला चोर ठरवून मारपीठ होते, परंतु खरा चोर दुसराच असतो असे हे नाट्य पुढे सरकते.

इकडे शिपाई घाशीरामाला कोठडीत डांबतात आणि दमदाटी करून निघून जातात. एका जीवन घटकाचे दर्शन इथे समुदायाशी येऊन भिडते. सूत्रधाराचा घाशीरामाला उपदेश 'ईश्वराला शरण जा' अशा पार्श्वभूमीवर सूत्रधाराचे मृदंगवादनासह कव्वालीवजा भक्तीगीत झुलता पडदा. शिपाई घाशीरामाला बळेच धरून एकीकडे नेऊन पेक्षागृंहात फेकून देतात. त्याच बरोबर ब्राह्मणी, ब्राह्मण, गुलाबी तिचे, चमचे, जार सारे येऊन उभे राहतात. आणखी एक मानभंगाची वेदना काळजा येऊन तमाम लोकापुढे घाशीराम उभा आहे. घाशीरामाचा दोन वेळेस झालेला अवमान त्या अवमानाचे आव्हान सर्वासमोर घाशीराम स्विकारतो हा प्रसंगच मोठा नाट्यपूर्ण आहे. घाशीराम पुण्यात उपरा आहे. त्यामुळे त्याने दिलेले आव्हान हे पोकळ वाटते. परंतु मागील संदर्भाने नानाचे दुबळेपण त्याने ओळखलेले आहे. नानांचा अश्रूपाय जोड्यासकट त्याला लाभला आहे. 'ऐसी बक्षिसी जनम् में किसीको नही मिलती' ही यावरची त्याची टिपणणी अर्थपूर्ण आहे. ही बरीच मोठी शक्ती त्याच्या हाती आलेली आहे.[५]

### *घाशीराम आणि नानाची अनैतिकता :-*

सूत्रधार हरदास बनतो तर घाशीराम कोठडीत असताना तो चोर झाला होता. असा हा बहुरूपी लोकनाट्यातला वाटतो. भजनाचे रूपांतर लावणीत होते तर लावणीचे भजनात असे बदल होत असतात. समुदायाचे सगळे प्रतिनिधी आहेतच. ब्राह्मण-ब्राह्मणी आहेतच. आणि माणसाचा झुलता पडदा देखील आहे. आता खुद्द नानांच्या वाड्यात 'आख्यान' चालू आहे. नाना हातातील फुलासह ब्राह्मणांना न्हाळाळीत आहेत. एका नुकत्या उमललेल्या कळीकडे सुकूमार सुंदर ब्राह्मणीकडे ते आकर्षित होतात आणि आख्यान समाप्तीनंतर एकटीला कोंडीत पकडून तिची मनधरणी करू लागतात. तिचा पाठलाग मग तिच्याशी झटू लागतात. ती बावरलेली हरिणीसारखी सैरावैरा असे हे रंग नृत्य नाट्य घडू लागते. पण अचानक घाशीराम मध्ये येतो तेवढ्यात ती सुंदर निसटून निघून जाते. घाशीरामच नानांना ती तरुणी निघून गेल्याचे सांगतो तेव्हा नाना भयंकर चिडतात, संतापतात. घाशीरामावर सूड उगवतात. पण उपयोग काय? पुन्हा त्यांचा राग शांत होतो. पुन्हा त्या सुंदरीला प्राप्त करण्यासाठी युक्त्या करतात. नाना-नौकर संभाषणातील गती म्हणजे यापुढील प्रसंग घाशीरामाचा खुनशी कावेबाजपणा आणि. नानाची कामातूर अगतिकता यांच्यामधील व्यंग नाट्याचा प्रसंग होय. या प्रसंगातील व्यंग आणि रंग वर्धिष्णु ठेवणारा प्रसंग नाना घाशीराम आणि समाजस्थिती ही येथील तिन्ही अंगे असंतुलित आहेत. त्यांच्या त्या मिश्र कृतीतून निर्माण होणारे वास्तव साहजिकच असंतुलित मुल्यव्यवस्थेचे द्योतक आहे. म्हणूनच स्वतःच्याच सुंदर सुकुमार मुलीला स्वतःहून नानाच्या शय्येपर्यंत स्वतःच्या हाताने नेऊन पोहचवतो आहे घाशीराम! पण हे करताना तो आत्मतांडव करतो. आत्मनिंदा ही करतो, म्हणूनच तो ओरडतो. ''बघा! बघा हा बाप आपली पोटची पोर धंद्याला लावणारा हा बाप बघा. माझ्यावर थुंका.... माझ्यावर दगड हाणा'' या बरोबरच मानहानीच्या वेदनेतून केलेला संकल्पही त्याच्या लक्षात आसल्यामुळे ''.... लेकिन मैं छोडूंगा नही, इस पुणे को। सुव्वरोंका राजही बनाऊंगा।'' हे ही उद्‌गार तोच काढतो. तरीही घडणारी चारित्र्याची विटंबना स्वतःच्या उघड्या डोळ्यांनी बघवणार नाही.६ नाना आणि ती मुलगी नाच, नाचा बरोबर ब्राह्मणांचा गजर चालूच आहे. या उलट्या फाशांत अंतर्भूत नाट्य आहे. हे एकदा-अनेकदा याची कल्पना घाशीरामाला आहेच. घाशीराम पुन्हा एकदा या गोष्टीला विरोध करतो. सौदा करतो, अशा या सौद्यातूनच घाशीराम पुण्याचा कोतवाल होतो. असे हे द्वंद्व नाट्य दोघांच्याही हुषारीचे. या द्वंद्वात जिंकले कोण? नाना की घाशीराम? काहीही असले तरी येथे घाशीरामाच्या आयुष्यातील एक पर्व संपले. हे नाना घाशीराम इतिहासातले नाहीत. अशा नाना घाशीरामांच्या जडणी घडणीची ही दंतकथाही नाही. तरी एकूण सगळा थाट दंतकथा सामावणारा ही निर्मिती आहे. नाटककारांची ऐतिहासिक, पारंपारिक संगीतनृत्यमय म्हणून ही अनैतिहासिक दंतकथा आहे.

### *घाशीरामाची नाट्यमय नैतिकता :-*

गर्दीत दिसेनासा झालेला घाशीराम पुन्हा दिसतो. डोके भादरलेला, शेंदूर भरलेला, उंटावर पालथा घालून मिरवलेला, हत्तीच्या पायात बांधून मिरवलेला, खूप मारखाल्लेला, विद्रूप झालेला, रक्तबंबाळ, चोहोबाजूंनी आणखी दगडांचा मार खाणारा, नानांचा आदेश पाळणारा दिसतो. मला मारा, जवळून मारा, ठेचा मला, मी गुन्हेगार आहे माझ्या बेटीच्या खुनाबद्दल! तो जमावाला सांगतो आहे.७ खरे तर ललितागौरीचा अंत केला आहे. तो नाना चंद्रासुईण यांनी मिळून. पण त्याचे मुळ आहे घाशीरामाच्या कृतीत म्हणून या मृत्यूची जबाबदारी तो स्वतःहून स्विकारतो आहे. नानांच्या देहाचे चोचले पुरविण्याचे मान्य केल्याबद्दल पूर्वी त्याने आत्मनिंदा

केली आहे, सर्वासमक्ष. आता या खुनाची जबाबदारी तो स्वत:वर घेऊन शिक्षेस सिद्ध झाला आहे. आपल्या दमनशाहीबद्दल, चलाखी बद्दल, हिस्त्रतेबद्दल म्हणजे चंद्रासुईणीचा खून केला म्हणून आपण गुन्हेगार आहो असे तो म्हणत नाही. आपल्या मुलीचा आपण गुन्हेगार आहोत म्हणून आपणास मारा असे तो सांगतो आहे. ही घाशीरामाची नैतिकता आहे. त्याला झालेला मनस्ताप आहे. पश्चाताच आहे, पण आता बराच उशिर झाला आहे. तरीपण एक बाप म्हणून तो उठूनच दिसतो. कारण हा घाशीराम अनैतिहासिक दंतकथेतला आहे. 'झाले गेले विसरून जात, आणि कामाला लाग' म्हणणारा निर्दावलेला मुरलेल्या नानाच्या विचारांच्या पार्श्वभूमीवर घाशीरामाची नैतिकता प्रामाणिकपणा उठून दिसतो. त्याची व्यक्तिरेखा, उंचावते. मानवतेच्या मुल्यांवर ही व्यक्तीरेखा नानापेक्षा उंत्तुग आणि प्रभावी वाटते.[८]

### *समारोप :-*

या नाटकामध्ये वास्तव सुसंगतीत सुसंवाद न राहणे, नाना आणि घाशीरामाच्या व्यक्तीरेखांना परिपूर्ण कथानकाच्या रूपाने दिशा मिळाली नाही. या पात्रांना आणखी म्हणावे तसे व्यक्त होता आले असते, परंतु काही तांत्रिकबाबी आणि संहितेच्या आशयाची मांडणी यामुळे त्यांना पुढे सरकता आले नाही. अनेक नाट्यविघ्ने आल्यामुळे शेवटी उरतो तो नाट्य, हरवलेला इतिहास आणि दंतकथा यांचा विसमतोल संयोगाचा परिणामकारक एक खेळ.

तसे पाहिले तर घाशीराम कोतवालपदी येण्यापूर्वी पुण्याच्या कोतवालीचा कारभार अन्यायी व खोटेपणाचाच होता. बावन्नखणीत दूराचार चाललेलाच होता. अनैतिक, भ्रष्ट आणि लबाडपणा चालूच होता. त्याबद्दल कोणीच काही करीत नव्हते. बक्षिस मिळालेला हार कोठीच्या मालकिणीला दिला नाही. म्हणून घाशीरामकडून हार हिसकावून घेऊन त्याला मारहाण करून रस्त्यावर फेकून दिले. याची दखल कुणीच घेतली नाही. 'रमण्या'त दक्षिणेचे पैसे चोरले गेले याबद्दल मारहाण, रस्त्यावर फेकणे, कोठडी आणि पुन्हा दिसलास तर 'डोके मारले जाईल' ही शिपायांकडून धमकी. त्याच बरोबर रमण्यात हजर असलेल्या इंग्रज अधिकाऱ्याने तो निर्दोष आहे असे सांगूनही घाशीरामला दूषणे देणे. त्याला दोषी ठरविणे कशासाठी आहे? कळत नाही. दंतकथेचे दंतकथापण त्यामुळे टिकत नाही. मानहानी, अपमान, या वेदनेचे शल्य नाटकाच्या घटना प्रसंगात व्यक्त न होणे, पूर्वापार घटना प्रसंगांनी चित्रण गतीत सुसंगती राहिली नाही. असाच काहीसा संमीश्र स्वरूपाचा प्रभाव शेवटी इथे व्यक्त होताना दिसून येतो. नाट्य हरवलेला इतिहास आणि दंतकथा याची विसंगतीच समोर येताना दिसते. प्रयोगशील आणि परिणामकारक असणारे कथानक नाटकाची उंची वाढवते. रसिक प्रेक्षकांना अंतर्मुख होऊन विचार करावयास भाग पाडते. ही या नाटकाची जमेची बाजू आहे.

### *संदर्भग्रंथ सूची :-*

१)जोशी प्र.न.- मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास अर्वाचीन काळ, १९७९ तेंडूलकरांच्या नाटक एकांकिकांचा परामर्श, पृष्ठ ४८.
२)घारे दिपक- घाशीराम एक वादळ १९९६ ग्रंथाली प्रकाशन मुंबई, पृष्ठ ६३.
३)जोग ल.ग. घाशीराम कोतवाल (विजय तेंडूलकर) अलोचना, मे १९८३, पृष्ठ ३९.
४)तेंडूलकर विजय- मी आणि माझी नाटके (शब्दांकन : कुंभोजकर रा.ज) साहित्यसूची, जुलै १९८३, पृष्ठ २७.
५)दावतर वसंत- तेंडूलकरांची नाट्यप्रतिभा लोकवाङ्मय गृह-मुंबई २००३, पृष्ठ ५६.
६)विजय तेंडूलकर घाशीराम कोतवालच्या निमित्ताने विजय तेंडूलकरांची मुलाखत (देशपांडे मीना) नाट्यदर्पण जुलै १९७६, पृष्ठ ३७.
७)दावतर वसंत- नाटककार विजय तेंडूलकर आलोचना जून-जुलै १९९०, पृष्ठ ४०.
८)घोंगडे रमेश- तेंडूलकरांचे नाटक पाठ्य व प्रयोग १९७९, पृष्ठ ५५.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org